विषय : बाल मानस शास्त्र

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनोविश्लेषण वाद ही संकल्पना कोणी मांडली? | विल्यम वूंट | अरिस्टॉटल | सिग्मंड फ्राईड | प्लेटो |
| २ | मूल्यमापनाच्या त्रिकोणाच्या शिरोबिंदू वर कोणता घटक आहे? | अध्ययन अनुभव | उद्दिष्टे | प्रत्याभरण | मूल्यमापन |
| ३ | एखादी कृती सहेतुक व ध्येयनिष्ठ दृष्टीने केलीतर तिचे संक्रमण मूल्य वाढते असे मत कोणी अध्ययन संक्रमणाच्या उपपत्तीत मांडले? | सी एच जड्ड | बॅग्ले | थॉर्नडाईक | गोपाळ स्वामी |
| ४ | यशस्वी अध्यापन म्हणजे काय? | 100%निकाल | सर्व विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण | विद्यार्थ्यांचे यश | परिणामकारक अध्ययन |
| ५ | अध्ययन प्रक्रियेच्या टप्प्याचा योग्य क्रम कोणता? | प्रेरणा, उद्दिष्ट, शोधन, पुनर्रचना, समायोजन | शोधन प्रेरणा उद्दिष्ट पुनर्रचना समायोजन | उद्दिष्ट, प्रेरणा, शोधन, समायोजन, पुनर्रचना | उद्दिष्ट, शोधन, प्रेरणा, समायोजन, पुनर्रचना |
| ६ | अध्ययन उपपत्तीच्या वर्गीकरणांमध्ये ज्ञानात्मक उपपत्ती मध्ये खालीलपैकी कोणत्या मानसशास्त्राचा समावेश होत नाही ? | ब्रूनर | गुथ्री | लेविन | गॅने |
| ७ | शैक्षणिक मानसशास्त्राची कोणती अभ्यास पद्धती शास्त्रशुद्ध असून काढलेले निष्कर्ष वस्तुनिष्ठ व विश्वासार्ह असतात ? | प्रायोगिक | निरीक्षण | सर्वेक्षण | जीवन वृत्तांत |
| ८ | भारताची मॉन्टेसरी आई म्हणून कोणाला ओळखले जाते ? | अनुताई वाघ | गिजुबाई बधेका | ताराबाई मोडक | कैलास सत्यार्थी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | कातड्याच्या निर्जीव पट्ट्याला अंधारात साप समजून आपण घाबरतो हे  कशाचे उदाहरण आहे ? | समावेशन | इंद्रिय भ्रम | मनाचा कल | चित्तभ्रम |
| १० | एकाच परीक्षकाने किंवा अनेक परीक्षकांनी कसोटी तपासली तर गुणांमध्ये फरक पडत नाही ही कसोटी कोणत्या प्रकारची असते ? | वस्तुनिष्ठ | विश्वसनीय | उपयुक्त | सप्रमाण |
| ११ | उत्तम फुटबॉल खेळाडू असणाऱ्या महेशने अपघातात पाय गमावला पण नंतर त्याने अभ्यास करून उच्च पदाची नोकरी मिळवली या त्यांनी कोणती संरक्षण यंत्रणा  वापरली | विस्थापन | प्रति पूरण | उदातीकरण | प्रक्षेपण |
| १२ | भावनिक बुद्धिमत्ता ही संकल्पना सन 1995 मध्ये जगासमोर आणणारे मानसशास्त्रज्ञ म्हणजे | पीटर सॅलोव्ही | थॉर्नडाईक | विलियम जेम्स | डॅनियल गोलमन |
| १३ | पुढे काही वर्तन बदल दिले आहेत त्यापैकी बोधात्मक वर्तन बदल कोणता आहे तो ओळखा ? | राजू चे त्याच्या कुत्र्यावर प्रेम आहे | शारदा सुंदर भरत काम करते | परिच्छेद वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे सोडवतो | सुनीताला शंख शिंपले जमवण्याचा छंद आहे |
| १४ | सरावामुळे अवधान सहजतेने होणे हे कोणत्या प्रकारचे अवधान आहे ? | अभ्यस्त अवधान | ऐच्छिक अवधान | अनैच्छिक अवधान | अवबोधन |
| १५ | संवेदनांना अर्थ लावण्याची प्रक्रिया म्हणजे | कल्पना | अवबोध | प्रतिमा | विचार |
| १६ | विद्यार्थ्याला व्यक्तिगत व सामाजिक मूल्यांची ओळख तसेच व व्यक्तिगत व सामाजिक मूल्यांची चिकित्सा करण्यासाठी कोणते प्रतिमान वापरता येईल ? | उदगमन प्रतिमान | भूमिका पालन प्रतिमान | अग्रत संघटन प्रतिमान | बोधात्मक विकास प्रतिमान |
| १७ | मानवी शरीराचे विविध अवयव शिकवताना विद्यार्थ्याला संपूर्ण मानवी शरीर दाखवतात व नंतर विविध अवयव स्पष्ट करतात शिक्षक कोणते  अध्यापन सूत्र वापरतात ? | ज्ञाताकडून अज्ञाताकडे | मुर्ता कडून अमूर्तीकडे | पूर्णांकडून अंशाकडे | अंशाकडून पूर्णाकडे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | मानसिक गोंधळ कोणता स्त्राव जास्त झाल्यामुळे होतो ? | थायरॉक्सिन | इन्शुलिन | टे स्टेस्टेरॉन | अँड्रेनलीन |
| १९ | मानसिक वादळाचा व भावनिक तणावाचा कालखंड असे कोणत्या अवस्थेला म्हटले जाते ? | प्रौढावस्था | उत्तर बाल्यावस्था | पूर्ववाल्यावस्था | कुमारावस्था |
| २० | हावर्ड गार्डनर यांच्या बहुविध बुद्धिमत्तेच्या सिद्धांतानुसार जे लोक स्वतःच्या आतील भावना स्वतःच्या मर्यादा स्वतःचे विचार अत्यंत अचूकपणे ओळखतात त्यांच्यात कोणती बुद्धिमत्ता प्रबळ असते ? | -व्यक्ती अंतर्गत बुद्धिमत्ता | अवकाशीय बुद्धिमत्ता . | आंतर वैयक्तिक बुद्धिमत्ता | अस्तित्ववादी बुद्धिमत्ता |

उत्तर सूची :-

| प्रश्न क्रमांक | उत्तराचा बरोबर पर्याय | प्रश्न क्रमांक | उत्तराचा बरोबर पर्याय |
|---|---|---|---|
| १ | क | ११ | ब |
| २ | ब | १२ | ड |
| ३ | ब | १३ | क |
| ४ | ड | ~~१४~~ | अ |
| ५ | क | १५ | ब |
| ६ | ब | १६ | ब |
| ७ | अ | १७ | क |
| ८ | क | १८ | अ |
| ९ | ब | १९ | ड |
| १० | अ | २० | अ |